# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 10/06/2021 (गुरूवार)

(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 06 कि. मी. अंतरावर मौजा बोर्डा शिवार येथे दि. 02/06/2021 चे 11.00 वा. ते दि. 08/06/2021 चे 02.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– सुशील कुमार लक्ष्मीप्रसाद पटेल, वय 42 वर्ष, रा. प्लॉट नं 220, गणेशनगर नागपुर हा बीएसएनएल कंपनीमध्ये इलेक्ट्रेशियन चे काम पाहत असुन साईड डाउन झाल्यामुळे अमृते याच्या शेतात लावलेले बीएसएनएल टावर चेक केले असता टावर च्या खाली असलेल्या कॅबीनेट चा अज्ञात आरोपीने रॉडनी दरवाजा तोडुन त्यामध्ये असलेले अमर राजा कंपनीचे एकुण 24 बॅटरी किमती 10,800,0/–रु. चा माल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि प्रवीण चव्हाण 8421433929 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील मौजा बोरगाव शिवार येथे दिनांक 08/06/2021 चे 07:30 वा. दरम्यान फिर्यादींचा साळा नामे– सुरज अशोक नाईक, वय 29 वर्ष हा त्याच्या एम.एच–40/एस–4538 क्रमांकाच्या मोटरसायकलने सावनेर वरून कळमेश्वर येथे जात असता रॉग साईडने येनारा एम.एच– 40/सी.डी–4848 क्रमांकरचा ट्रकचा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एम. एच–40/एस–4538 क्रमांकाच्या मोटरसायकला समोरून धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक सुरज नाईक हा गंभीर जखमी झाला व उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी नामे– प्रदीप विठोबाजी भोंगाडे, वय 36 वर्ष, रा. वार्ड क्र. 14, होळी चौक, सावनेर पोस्टे. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनी नागवे मो.क्र. 9823403565 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर